# प्रकरण सातवे

## उपसंहार

# प्रकरण - ७

## उपसंहार

आप्पासाहेब खोत यांच्या कथालेखनाचे विशेष त्यांच्या 'गवनेर' व 'महापूर' या कथासंग्रहाच्या आधारे नोंदवण्यासाठी या प्रबंधिकेची मांडणी केलेली आहे. ही मांडणी करत असताना पहिल्या प्रकरणात प्रास्ताविकात मराठी कथा म्हणजे काय ते सांगितले आहे. तसेच पूर्वाभ्यासाचे स्वरूप मांडत असताना मराठीतील ग्रामीण कथेचे वेगळेपण सांगून ग्रामीण कथा ही नागर कथेपेक्षा पूर्णपणे वेगळी मानली जाते. ग्रामीण कथेतून खेड्यातील जीवन पध्दतीचा आविष्कार होतो. तेथील शेती, निसर्ग, गावगाडा या साऱ्यांशी ती निगडीत असते. खेड्यातील संस्कृतीची प्रादेशिक वैशिष्ट्ये तिच्यात प्रतिबिंबीत झालेली असतात. ग्रामीण कथेत खास ग्रामीण अनुभूतीला प्राधान्य दिलेले आढळते. त्यामुळे ती अस्सल ग्रामीण ठरते. शिवाय ग्रामीणता ही भूमिका अधिक समजून देताना निसर्ग, कृषी संस्कृती, रूढी, परंपरा व अंधश्रध्दा, मुक्या प्राण्यावर प्रेम, ग्रामीण मन, दारिद्रय व अस्पृश्यता इ. च्या द्वारे सविस्तर विवेचन केले आहे. श्री. खोत यांच्या पूर्वकालीन कथालेखनाचे स्वरूप स्पष्ट करताना ग्रामीण कथा म्हणून उल्लेखिलेल्या ह. ना. आपटे यांच्या 'काळ तर मोठा कठीण आला' चा उल्लेख करून वि. स. सुखठणकर, सरदेसाई, ग. ल. ठोकळ, म. भा. भोसले, वामन चोरघडे, बी. रघुनाथ, चि. म. मराठे यांनी ग्रामीण कथेत केलेल्या कामगिरीचा नामोल्लेख करून श्री. म. माटे यांनी उपेक्षितांचे अंतरंग, माणुसकीचा गहिवर या कथातून मांडला हे सांगितले आहे. उपेक्षित, पददलित, खालच्या स्तरातील व्यक्तीचे जीवन काय असते, त्यांचे दुःख, वेदना स्पष्ट करून प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात त्यांची कथा परखड आणि विद्रोही भूमिका न घेता सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात हळहळ व्यक्त करते. त्यांची दृष्टी मानवतावादी दृष्टी आहे हे स्पष्ट होते.

नवकथेतच्या कालखंडात ग्रामीण कथेत व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील,

द. मा. मिरासदार, यांनी दिलेले महत्वपूर्ण योगदान वैशिष्ट्यांसह त्यांच्या काही कथांच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. पुढे आनंद यादव, बाबा पाटील, उध्दव शेळके, रा. रं. बोराडे, सखा कलाल यांनी ग्रामीण कथेला आशय आणि आविष्काराच्या बाबतीत समृध्दता प्राप्त करून दिली ते उदाहरणासहित मांडले आहे. तसेच तिसऱ्या पिढीतील कथालेखन करणाऱ्या चारूता सागर, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे, भास्कर चंदनशिव, मोहन पाटील, श्रीराम गुंदेकर, उत्तम बंडू तुपे, अर्जुन भोसले, नागनाथ कोतापल्ले, वामन होवाळ या सारख्या कथा लेखकांनी समृध्द केलेल्या ग्रामीण कथेचा पट विशेषासह या लेखनातून उलगडून दाखवला आहे. आप्पासाहेब खोत यांच्या समकालीन चौथ्या पिढीतील ग्रामीण कथा लेखकांचा धांडोळा घेताना त्यांच्या कथालेखनाची वैशिष्ट्येही नोंदवली आहेत. यात समकालीन म्हणून नामदेव माळी, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, आनंदराव पाटील यांच्या कथांचा परामर्ष घेऊन मराठी ग्रामीण कथेत त्यांनी केलेल्या कामगिरीचा विशेषांसह आलेख मांडला आहे आणि अखेरीस आप्पासाहेब खोत यांनी ग्रामीण कथाविश्वात महत्वपूर्ण केलेल्या कामगिरीचे दिग्दर्शन येथे घडविले आहे. त्यांची कथा मानवी मनाच्या चित्रविचित्र तऱ्हा, जीवन जगण्यासाठी धडपडणारी नायक-नायिका प्रस्थापित व्यवस्थेतील ग्रामीण वयस्कर माणसाची होणारी आबाळ अशा विविधतेने त्यांनी आपले कथाविश्व समृध्द केले आहे. ते मांडून या कालखंडात लेखन करणाऱ्या कथाकाराच्या ग्रामीण कथा वेगवेगळ्या दिशातून वेगवेगळ्या आशय अभिव्यक्तीतून बदलत्या गती-स्थितीतून अनेकता, विविधता, मूल्यसंस्कार इत्यादींने परिपूर्ण बहरत आहे. ते मी माझ्या परीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकरण दुसरे –** दुसऱ्या प्रकरणात आप्पासाहेब खोत यांच्या वाङ्‌मयीन व्यक्तिमत्वाचा आणि जडणघडणीचा आलेख अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. खोत यांच्या व्यक्तिमत्वाला पूरक असे वातावरण सुरूवातीला त्यांच्या घरापासून, मळ्यापासून, शेतीपासून पूरक ठरले गेले. त्याचा ठसा त्यांच्या मनावर उमटला आहे. आई-वडील अडाणी असले तरी त्यांचे मन फार मोठे होते. त्यांची सद्‌भावना तर आदर्श होतीच पण संस्कृतीही उच्च होती. स्वत: कष्ट सोसून इतरांना मदत करण्यात इतराना सहकार्य करण्यातच आयुष्याची धन्यता त्यांनी मानली होती. आईने तर हाताचा पाळणा, नेत्राचा दिवा करून वाढवले, घडविले.

दोन तीन वेळा मृत्यूच्या दारातून आईनेच माघारी आणले. त्या माऊलीचे ऋण लेखकाने उराशी बाळगले आहेत. घरातील संस्कार त्याच्या जोडीला वाचन आणि आजूबाजूच्या जगाचे जीवनाचे, माणसाचे सूक्ष्म निरीक्षण या शिदोरीवरचं त्यांनी आपले वाङ्मय विश्व उभे केले आहे. लेखक कसा घडतो याची जाण त्यांना होती. त्याविषयी ते स्वत: सांगतात - जो दुसऱ्यांची दु:खे पाहून ज्याचे अंत:करण गहिवरते व दुसऱ्याचा आनंद पाहून ज्याचे मन बेहोष होते तो संवेदनशील माणूसच लिहू शकतो. शिवाय शेती, माती, नाती आणि संस्कृती ही पंचसूत्री अंगिकारल्यास कसदार साहित्य निर्माण होईल. या त्यांच्या विचारधारेतूनच त्यांचे सर्व लेखन झाले आहे. त्यांच्या जीवनाला बदलत्या खेड्याची पार्श्वभूमी आहे. ग्रामीण परिसराचे आणि त्याचे जवळचे नाते आहे. आजच्या ग्रामीण समाजात वावरतात त्या समाजाचे जिवंत अवलोकन शक्तीच्या जोरावर कथेतून करतात. त्या समाजाशी ते पूर्णपणे एकरूप झालेले असतात. खोत यांच्या व्यक्तिमत्वाला जे विविधअंगी स्वरूप प्राप्त झालेले आहे त्याला बदलत्या खेड्याचे रूप आणि ग्रामीण परिसराशी असलेले अतूट नाते यांचा अनन्यसंबंध त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या घडणीसाठी कस कसा घडत गेला आणि तळागाळातील आजच्या खेड्याचे भावविश्व सर्व ताण-तणावासह प्रतिबिंबीत करतात. ज्या खेड्यात अर्धी चतकोर भाकरी वाटून खाल्ली जात होती, त्याच खेड्यात आज भाकरी हिसकावून घेण्याची विकृती आली. वासनेचा आणि लबाडीचा, लाचारीचा, फसवेगिरीचा कल्लोळ आज खेड्यात होताना दिसतो. स्वत:च्या स्वार्थासाठी रक्ताचं नातं विसरलेली माणसं एकमेकांवर तुटून पडू लागली. गावा-गावात समाज-समाजात निष्ठा, प्रेम, जिव्हाळा, त्याग, सारं-सारं संपलं. खाणं-पिणं आणि भोगणं यासाठीच आजची तरूणपिढी वेडी झाली. रिकामं फिरणं आलं आणि त्यातून मग नको ते करणं आलं. संधीसाधू याचा उपयोग करू लागले. कोठेही आणि कशातही स्थिरता राहिली नाही. अस्थिरतेने परिस्थिती नाजूक बनली. बेगडी-नकली जीणं आलं त्यामुळे जे चांगले आहे त्याचा नाश झाला. या सर्व जाणिवा, व्यथा, वेदनांना लेखकाने पाहिल्या. त्याचा मनावर खूप परिणाम झाला. त्या सतत बोचत राहिल्या. हे कुठंतरी थांबायला हवं. कुणीतरी सांगायला हवं. या उर्मीतून त्यांनी आपल्या कथा प्रबोधनात्मक वसा घेऊन साकार केल्या आहेत असे दिसते. समाज जीवनाचे होणारे अध:पतन थोपवू पाहणारे समाजशील लेखक मोठ्या ताकदीने माणुसकीचे चित्रण



SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

देणारे विचार प्रकट करत जातात. खोत यांनी आपल्या लेखनात मानवी मूल्याचा खेड्यात होणारा ऱ्हास जाणीवपूर्वक प्रतिबिंबीत केला आहे. याचा मागोवा येथे घेतला आहे. प्रकरणाच्या शेवटी सात निष्कर्ष देऊन आप्पासाहेब खोत यांच्या वाङ्मयीन जडण-घडणीचा यथार्थ परामर्ष या प्रकरणातून घेतला आहे.

**प्रकरण तिसरे –** तिसऱ्या प्रकरणातून आप्पासाहेब खोत यांच्या समकालीन कथालेखक व खोत यांच्यातील पृथकत्वाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. चौथ्या पिढीतील ग्रामीण कथालेखकानी आपले अनुभवविश्व बदलत्या जाणीव-नेणीवासह अभिव्यक्त केले आहे. १९८० नंतरच्या सामाजिक, सांस्कृतिक बदलाचा परिणाम ग्रामजीवनात राहणाऱ्या या लेखकाच्या जीवनावर झाल्याचे दिसते आणि त्या त्या काळात प्रदेशात खेड्यात राहणाऱ्या लेखकाचे जीवन परिपूर्णरित्या ढवळून निघाले होते. ही पिढी प्रस्थापित व्यवस्थेला प्रामुख्याने सामोरी गेली आहे. त्यामुळे अनुभवविश्वाची संपन्नता अधिक. त्याच अनुभव संचितातून त्यांनी साहित्यकृती निर्मितीचा ध्यास घेतला गेल्याचे दिसते. तिसऱ्या पिढीतील लेखकानी जाणिवेच्या पातळीवर पूर्वग्रामीण साहित्याचे अंधानुकरण केल्याचे दिसते. त्यांच्या साहित्यकृतीतून तोचतो आविष्कार होत राहिल्याचे जाणवते. परंतु या पिढीतील लेखकानी हे सर्व झुगारून दिल्याचे दिसते. कलात्मकदृष्ट्या संपन्न असणारी आजची ग्रामीण कथा वेगवेगळ्या प्रदेशात त्या-त्या लेखकानी आविष्कारसंपन्न बनवली आहे. प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, आप्पासाहेब खोत, नामदेव माळी, आनंद पाटील अशी कितीतरी नावे घेता येतील. बदलत्या खेड्याच्या व्यथा आणि वेदना या लेखकांनी अतिशय संवेदनशीलतेने टिपलेल्या आहेत. परंतु आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत त्यांचे वेगवेगळे रूप-स्वरूप जाणवते. प्रत्येकाची कथेची धाटणी वेगळी आहे. परंतु ग्रामीण माणसाचं नातं सांगणारी ग्रामीण संस्कृतीचं वास्तव, विदारक दर्शन घडवणारी अनुभवसंपन्न कथा निर्माण झाल्याचे दिसते. तिचा नेमका परिणाम असा झाला की, आजच्या ग्रामीण साहित्य प्रवाहात ग्रामीण कथा विश्वाला एक मुलभूत अधिष्ठान प्राप्त झाले आहे यात शंका नाही. शिवाय अनुभूतीतील ताजेपणा आणि अभिव्यक्तीतील चैतन्य यामुळे ते लक्षवेधी ठरले आहे. या पिढीतील ग्रामीण लेखक आपल्या अनुभवाच्या संचितातून त्याच्या साहित्यकृतीची निर्मिती , मांडणी कसा करत जातो याचे बारकावे या प्रकरणातून टिपण्याचा प्रयत्न केला आहे. समकालीन

कथालेखकापेक्षा आप्पासाहेब खोत यांच्या कथालेखनाचा पिंड खूपच वेगळा आहे. असे काही ठिकाणी निश्चितपणे कथा वाचताना वाटते. समग्र खेड्यातील माणसांची वृत्ती-प्रवृत्ती अभिव्यक्त करण्यात खोत आघाडीवर आहेत. साहित्याने सामाजिक बांधिलकी मानावी. साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य संबंध मानणारा हा लेखक प्रबोधनाच्या अंगाने आपले लेखन करत जातो. पण केवळ प्रबोधन करणे हे त्याचे प्रयोजन नाही. तर कलात्मक उंची गाठणे आणि वाचकाला आनंद प्राप्त करून देणे हे ही साध्य करतात. नामदेव माळी, प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, आनंदराव पाटील या समकालीन लेखक महोदयांनी ग्रामीण जीवनाचे दु:ख, दारिद्र्य, गावगाड्यात घडणाऱ्या घटना, घडमोडी यांचे चित्रण केले आहे. स्त्री -दु:खाची वेदना हा इंगोल्याच्या कथेचा गुणधर्म अधिक प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. नामदेव माळी यांनी आजच्या खेड्यातील माणसाच्या मनात होणारा उद्रेक अचूकपणे टिपला आहे. मुसळे आणि देशमुख यांनीही स्त्री-पुरूषाची जगण्यासाठी होणारी ओढाताण दु:ख जाणिवेसह स्पष्ट केली आहे. आप्पासाहेब खोत ग्रामीण माणसाच्या दु:खाबरोबरच विसंगती टिपतात. शिवाय हे सर्व लेखक ग्रामीण माणूस केंद्रीभूत ठेवून, त्यांच्या दु:खाचे, व्यथाचे, वेदनाचे अनेक पदर उलगडून दाखवतात. तथापि खोत यांच्या दु:ख, वेदनेची सल व्यक्त करण्याची वेगळी धाटणी दिसते. इंगोले या दु:ख मिमांसेची कारणे शोधताना सामाजिक व्यवस्थेवर भर देतात तर आप्पासाहेब खोत यांच्या माणसाचे दु:ख माणसानेच निर्माण केल्याचे दिसते. त्यातल्या त्यात कुटुंबातील नात्यातील बदलती स्थिती शिवाय त्या माणसाची परिस्थिती त्याला कारण झालेली असते. खोत यांची कथा ग्रामीण कथा, व्यक्तिप्रधान ग्रामीण कथा आहे. ग्रामीण माणसाच्या सर्व जाणिवा, व्यथा, वेदना, सुख, दु:खासह त्याच्या अंतर्मनाचा गाभा शोधण्याचा प्रयत्न करते आहे. इतर कथालेखकापेक्षा ग्रामीण विधवा स्त्रीचं जीवघेणं दु:ख चित्रित करणं हा त्यांच्या कथा लेखनाचा खास वेगळेपणा आहे. विषय वैविध्य हा त्यांच्या लेखनाचा खास वेगळा विशेष म्हणून नोंदवावा लागतो. एड्स, ऊसतोड, कामगार-मालक व्यथा, विधवा विवाह असे कितीतरी विषय हाताळले आहे. मानवी नात्यातील फोलपणावर त्यांनीच सर्वाधिक भाष्य केले आहे. नात्यानं बाप, घर आणि बंगला, पाटाचं पाणी इ. कथा संवादमयशैली हा लेखक खोत यांचा लेखनाचा विशेष समकालीनापेक्षा वेगळा आहे. संपूर्ण कथा संवादातून साकार होते. व्यक्ती

परिस्थिती, व्यक्ती आणि व्यक्ती, व्यक्ती आणि बदलता काळ, व्यक्तीच्या मनातील द्वंद्व याचे संघर्ष रूप घेऊन खोत यांची कथा उभी राहते. त्यामध्येही दु:खाचे कड सोसणारी माणसे त्यांनी उभी केली आहेत. नामदेव माळी याचा नायक पेटून उठतो तर खोत यांचा नायक इगत करतो. आशयात आविष्कार की आविष्कारात आशय इतकी एकरूपता अभावानेच चौथ्या पिढीतील ग्रामीण कथालेखकामध्ये जाणवते, ती खोतांच्या कथेत सहज आपणास प्रत्ययास येते. एक साहित्यिक जाण असलेला आप्पासाहेब खोतांसारखा लेखक अशा रितीने वेगळ्या पिंडाने लिहितो. त्याच्या अभिव्यक्तीचे सामर्थ्य त्यांच्या निवेदनातील संवादात्मक व्यक्तिचित्रणातील वेधकता दु:ख, वेदनाची तीव्रता, ग्रामीणतेचे अनोखे दर्शन, विषय वैविध्य, मानवी नात्यातील फोलपणा यासारख्या अनेक बाजूंनी आप्पासाहेबांच्या कथेत आलेले पृथत्व पारदर्शकपंणे शोधण्याचा प्रयत्न केला आहे आणि अखेरीस प्रकरणाचे चौदा निष्कर्ष देवून नोंद करून प्रकरणाचे सामर्थ्य बलवान केले आहे.

**प्रकरण चार –** हे आप्पासाहेब खोत यांच्या 'गवनेर' कथासंग्रहाच्या विशेषांची दखल घेण्यासाठी व अभिव्यक्तीच्या सामर्थ्याच्या अनुरोधाने मांडणी केली आहे. गोषा, दसऱ्याची कडाकणी, गवनेर, रान तुळस, पान्हा, जोजकार, वाट, तोंड, गुतापा, घात, भोग, उद्ध्वस्त इ. कथांचा प्रथम समग्र आशय मांडून या कथासंग्रहातील आशयदृष्ट्या समृध्द असलेले विशेष मांडले आहे. खोत यांच्या कथेत गावगाड्यातील सर्व जाणिवा, तिथली व्यवस्था, त्यातला माणूस, तिथल्या अडी-अडचणी, त्या सोडवण्यासाठी व त्यांना सामोरे जाण्यासाठी माणसाची चाललेली धडपड याचे वर्णन करून बदलत्या काळात आणि बदलत्या परिस्थितीत ग्रामीण माणूस कसा बदलतो आहे याचे इतिभूत वर्णन केले आहे. या संग्रहात खेड्यातील उपेक्षित माणसाची, शोषितांची दु:खे लेखकाने या संग्रहात अभिव्यक्त केली आहेत. कोल्हापूर परिसरात माणसाचे सुख, दु:ख त्याला साजेशा भाषाशैलीतून ते मांडतात. या दृष्टीने त्यांची 'घात', 'पान्हा', 'भोग' इ. कथा पाहण्यासारख्या आहेत. या दु:खाच्या असहाय्य वेदनेची नस त्यांच्या कथेचा धागा आहे. ही वेदना निर्माण होते ती दारिद्र्यातून तर काहीवेळा माती आणि माणुसकी विसरलेल्या जाणीवेतून उदा. दसऱ्याची कडाकणी, जोजकार, वाट, घात, भोग इ. खोत यांच्या 'गवनेर' या कथा संग्रहांत अंधश्रध्देचे चित्रण येते आहे. शिवाय प्रेम, जिव्हाळा, कौटुंबिक सुख-दु:खाचे तिथल्या ताण-

तणावाचे संघर्षमय जीवन चित्रित झाल्याचे अनेक उदाहरणातून दाखविले आहे. शिवाय अभिव्यक्तीच्या अंगाने हा कथासंग्रह वाचनीय झाला आहे. ग्रामीण जीवन म्हणजे कृषीजीवन या कृषी जीवनाचे चित्रण खोतांनी आपल्या कथेत केले आहे. 'घात' 'जोजकार' इ. कथातून ते आढळते. अभिव्यक्तीच्या अंगाने विचार करताना कथानक हा त्यांच्या कथेचा महत्वाचा पैलू आहे. कोणत्याही कथेमध्ये एक गोष्ट असते. गोष्ट म्हणजे घडून गेलेली हकीकत. त्यामुळे स्वाभाविकच कथेचा काळ भूतकाळ असतो. कथा म्हणजे भूतकाळात घडून गेलेली हकीकत परंतु भूतकाळात घडून गेलेल्या कोणत्याही हकीकतीला कथानक म्हणत नाहीत. हकीकत ही प्रत्यक्षात घडलेली कार्यकारणसंबंधानी बांधलेली वास्तव घटना असते. कथानकातील 'गोष्ट' ही लेखक निर्मित असते. लेखकाने विशिष्ट स्वभावधर्माची पात्रे निर्माण केलेली असतात. कथांतर्गत घटना व प्रसंगाची निर्मिती करून त्या घटना प्रसंगात त्या पात्रांना काही एक कृती करायला लावलेली असते. पात्रांच्या मनातील अंत:करणाचे बारकावे ह्या कृतीशी जोडलेले असतात. कथानकाचा प्रारंभ व शेवट यात कथेच्या परिणामाच्या दृष्टीने लेखकाने काहीएक कौशल्यपूर्ण योजना केलेली असते. हकीकतीत घटना - प्रसंगाचा क्रम त्या घटना जशा घडत गेल्या त्या क्रमाने येतो. कथानकात ही क्रमबध्दता लेखक पाळतोच असे नाही. खोत यांच्या कथांचे रूप अशा स्वरूपाचे आहे. या पठडीत ते आपल्या कथेची उभारणी करतात. त्यांनी जवळ-जवळ सर्व कथातून घडून गेलेल्या घटना व त्या घटनाचा आजच्या व्यक्तीला भोगावा लागणारा परिणाम यांची मांडणी केली आहे. खोतांच्या कथेतील कथानक व्यक्ती या गत जीवनाकडे पाहून होणारी अगतिकता ते कथनरूपात गुंफतात. कथेत लेखकांनी ग्रामीण परिसरातील कष्टकरी स्त्री-पुरूषाच्या व्यथा, वेदना, घटनाक्रमानुसार चित्रित केल्या आहेत. ही पात्रे चल स्वरूपाची आहेत. त्यांच्या कथेतील स्त्री-पुरूष व्यक्ती ह्या बदलत्या काळानुसार बदल स्वीकारतात. परंतु ती आपली संस्कारमूल्यही जपतात. त्यांना मुळासह बदल नको आहे. व्यक्तीमनाचे अनेक कंगोरे त्यांची कथा व्यक्त करते. व्यक्ती जीवनाचा अन्वय लावणे हा त्यांचा खास विशेष होय. त्याचे उदाहरणासह येथे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. विधवा स्त्री जीवनाचा पट ही त्यांनी उलगडून दाखवला आहे. त्या व्यक्ती साक्षात कशा उभ्या केल्या याचे वर्णन या प्रकरणात करण्याचा प्रयत्न केला आहे. या संग्रहातील निवेदनाची पृथकता,

संवादशैलीचे स्वरूप, भाषाशैलीचा डौल कसा प्रतिबिंबीत झाला आहे याचे अनेक संदर्भ देवून स्पष्ट करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. माणुसकीची शिकवण, बदलत्या जाणीवा, मानवी नाती, त्या नात्यातील सुप्त संघर्ष, ती नाती जपण्यासाठी माणसाची होणारी ओढाताण, या सर्व प्रवृत्ती लेखकाने स्पष्ट करताना अभिव्यक्तीने सामर्थ्यशाली अशी जी धाटणी अवलंबिली त्याचे अनेक उदाहरणाच्याद्वारे आणि समृध्द संदर्भाच्या आधारे स्पष्ट करून त्यांच्या कथासंग्रहाची विवरणात्मक आणि समीक्षणात्मक दखल येथे घडविली आहे.

**प्रकरण पाच :–** त्याचप्रमाणे प्रकरण पाचमध्ये 'महापूर' कथा संग्रहाचे विशेष आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने पडताळणीचा प्रयत्न केलेला आहे. प्रथम 'महापूर' या कथासंग्रहातील 'महापूर' अदावत लेकावळा, ऐपत, वाटणी, परवड, तोडगा, जोसरा, पाटाचं पाणी, पाण्याविना मासोळी, नात्यानं बाप, कोंडमारा, घर आणि बंगला, ऊन-सावली, इगत इ. कथांच्या मांडणीचे स्वरूप स्पष्ट करून आशय अभिव्यक्त केला आहे. नंतर आशयाची समृध्दता आणि विशेष म्हणून विषयाचे वैविध्य हे जाणीवपूर्वक हाताळले आहे. लेकावळा, परवड, जोसरा, नात्यानं बाप इ. कथांचा संदर्भ देवून केले आहे. कौटुंबिक चित्रणातील ताण-तणावाचे चित्रण त्यांची कथा करते. हे अनेक उदाहरणातून दाखवून दिले आहे. त्यातच भाऊबंदकीचे होणारे अनोखे दर्शनही घडविले आहे. त्याचबरोबर दुःख, दारिद्र्याचे चित्रण कसे आले आहे हे अनेक कथांच्या माध्यमातून विवेचले आहे. संघर्षमय जीवनाचा पटच जणू खोत यांनी या संग्रहात मांडला आहे. हे उदाहरणासह दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. जीवन म्हणजे झुंज आहे आणि ते झुंजत झुंजतच जगले पाहिजे अशी वृत्ती मानून 'महापूर' या कथासंग्रहातील बहुतेक करून स्त्री-पुरूष जीवन जगताना आढळतात. जीवन संघर्ष हा खोतांच्या कथेचा पिंड आहे. जगताना व्यक्तीला करावा लागणारा जीवघेणा संघर्ष हा मोठा विदारक आहे. पोटासाठी , दोन घासासाठी दिवसभर मुरूम खोदणारे रामा आणि सीता 'परवड'मध्ये आढळतात. व्यसनाधीन पतीबरोबर संसार करताना अनसाला अनेक संकटांना तोंड देत मार्गक्रम करावा लागतो. याचे विवरण येथे करण्याचा प्रयत्न केला आहे. निसर्ग आणि माणूस याचं अतूट नातं आहे ते नाते लेखकाने काही कथांमधून कशा रितीने घडविले आहे ते सांगण्याचा प्रयत्न येथे केला आहे. शिवाय निसर्गात ग्रामीण माणसाच्या जीवनात जे तांडव निर्माण केले आहे. त्या

त्या माणसाला हतबल करताना जी विविध रूपे धारण केली त्याचे यथार्थ अवलोकन करण्याचा प्रयत्न केला आहे. परवड कथेत दुष्काळ स्थितीचा उल्लेख करावासा वाटतो- 'दुष्काळ पडला आणि हे गाव आगीत फुटाणा भाजावं तसं भाजून गेलं. दुष्काळानं करपून गेलं. त्याला कसली ती रया राहिली नाही. माणसाच्या पोटापाण्याची पंचायत पडली. गुरं-ढोरं चिपाडं झाली. उभं गाव पाण्याला महाग झालं. माणसाला जगावं कसं हेच कोडं पडलं. पाण्यासाठी माणसं दाहीदिशा हिंडायला लागली.' या चित्रणात निगर्सापुढे माणूस हतबल होताना दिसतो आहे. या कथासंग्रहातील सर्वच कथा एकत्रित वाचल्या तर आशयदृष्ट्या त्या समृध्द वाटतात. ग्रामीण जीवनाचं वास्तव हृदयस्पर्शी कारुण्य दु:ख याचं चित्रण करणाऱ्या कथा यात जणू एकवटल्या आहेत. असे वाटते. अभिव्यक्तीच्या अंगाने 'महापूर' विशेष स्पष्ट करताना कथा यशस्वी होण्यासाठी विषय आणि आशयाबरोबर अभिव्यक्ती ही तितकीच प्रभावी असावी लागते. साध्या विषयात मोठा आशय संपन्न करण्याचे सामर्थ्य लेखक खोत यांच्या लेखनशैलीत आहे. प्रस्थापितांचे आशय वाचकांपर्यत पोहोचवण्याचे सामर्थ्यही त्यांना लाभलेले आहे. त्यांच्या कथेचे कथानक, वातावरण निर्मिती, व्यक्तिचित्रण, निवेदनशैली, भाषाशैली याने परिपूर्ण झालेले आहे. ते अनेक संदर्भासह पटवून देण्याचा प्रयत्न या प्रकरणात केलेला आहे. कथानक ही व्यापक कल्पना असून कथात्मकता हा कथानकाचा प्राण आहे. लेखकाच्या जीवनविषयक कलात्मक दृष्टिकोनावर कथात्मकतेचे स्वरूप नक्की होते. व्यक्ती, घटना, प्रसंग व निवेदन या सर्व घटकांनी मिळून कथानक तयार होते

याचा प्रत्यय त्याच्या या कथासंग्रहात दिसतो. तो मांडण्याचा प्रयत्न येथे केला आहे. आप्पासाहेब खोत यांची कथा ही व्यक्तिप्रधान स्वरूपाची कथा आहे. कौटुंबिक पातळीवरील ताण्या-बाण्यातून साकार होत जाणारे व्यक्तीचे जीवन अनेक आघाताने उन्मळून जाते. रोजच्या जीवनातील कटकटी प्रचंड दारिद्रय, शिवाय विचारातील फारकता जे हवं आहे ते मिळत नाही. यासाठी धडपड इ. अंगाने खोत यांची कथा आकाराला येते. शिवाय 'महापूर'मधील कथा वर्तमानात घडत आहेत. वर्तमानाचा संदर्भ घेऊन साध्या घटना प्रसंगातून मोठा आशय निर्माण करून एकच एकतत्व प्रतिबिंबीत करणं हा लेखकाचा हेतू कथालेखनामागे दिसतो. त्या दृष्टीने कथानकाची रचना जाणीवपूर्वक केलेली आहे. व्यक्तिचित्रणाच्या बाबतीत खोत यांची

कथा ग्रामीण जीवनातील माणसाच्या विविध वृत्ती प्रवृत्ती चित्रित करणं हा त्यांच्या कथेचा खास पिंड आहे. त्या व्यक्ती उभ्या करण्याचं सामर्थ्य त्यांच्या लेखनशैलीत आहे. स्थळकाळान्वये व्यक्ती या बदलत असतात. आपल्या मनाला समजूत घालतात. परिस्थितीशी जुळवून घेतात. ग्रामीण जीवनातील स्त्री-पुरूषाच्या भाव जीवनाचे अनेक कंगोरे लेखक खोत यांनी या संग्रहात टिपले आहेत. त्याचा परामर्श येथे घेतला आहे. वातावरण निर्मिती करताना लेखकाने जी शैली वापरली आहे ती पाहण्यासारखी आहे. व्यक्ती आणि घटना प्रसंग एखाद्या स्थलकालाच्या चौकटीतच घडत असतात. महापूर कथासंग्रहातील सर्वच कथातील व्यक्ती आणि घटना-प्रसंग हे खेड्यात घडत आहेत. त्याला सामाजिक विशिष्ट प्रकारचा स्तर आहे. शिवाय त्या व्यक्ती कौटुंबिक पातळीवरच वावरत आहेत. त्यामुळे त्यांच्या कथेला कौटुंबिक वातावरणाची पार्श्वभूमी आहे. वातावरण निर्माण करण्याचे लेखकाचे खास तंत्र आहे. एक दोन वाक्यात एखाद्या शब्दातून नाट्यात्मक कलाटणी देत प्रसंग उभा केला जातो. त्याला गहिरे रूप देवू केले जाते. 'दातावर मारीन म्हटलं तर एक पैसा नाही.' 'महापूर' 'आमी गरीब माणसं ईक खाईन म्हटलं तर पैसं न्हाईत.' 'परवड' असे विवेचन करून वातावरण निर्मितीचे रूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न येथे केला आहे. निवेदनशैलीचे रूप स्पष्ट करताना संवादमय शैली हा खोत यांच्या कथालेखनाचा खास पिंड कसा हे त्यांच्या या संग्रहात साकार केले आहे. हे येथे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. काही ठिकाणी प्रथमपुरूषी तर काही ठिकाणी तृतीय पुरूषी निवेदन पध्दतीचा कसा आविष्कार झाला आहे ते येथे दाखवले आहे. शिवाय निवेदन करताना उपरोधिक उपहासगर्भ शैलीचा वापर लेखक करताना आढळतो. ते येथे विवेचले आहे. मनोवर्णनातून मनोविश्लेषण करताना त्यांनी अभिव्यक्तीचे खास पापुद्रे व्यक्त केले आहेत. त्याचा परामर्श येथे घेतला आहे. भाषाशैलीचा वापर कथा खुलवण्यासाठी जाणीवपूर्वक केल्याचे त्यांच्या कथा वाचताना जाणवते. ते मांडण्याचा सादर प्रयत्न केला आहे. खोत यांची भाषा साधी सरळ आणि ओघवती आहे. तिला अलंकारिक बाज नाही. ग्रामीण नागर असे संमिश्र स्वरूप त्यांच्या भाषेचे आहे. निवेदकाची भाषा आणि पात्रांची भाषा असे रूप ते अनेक उदाहरणाने पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाय स्त्रियांच्या तोंडी पुरुषबोलीचे शब्द आढळतात. त्याचा परामर्श घेतला आहे. या प्रकरणात शेवटी त्यांच्या कथेतून नवा माणूस घडविण्याचा

माणुसकी जपण्याचा मानवी मनाचा शोध घेण्याचा आणि त्यातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न त्यांची कथा करते. ग्रामीण माणसाची व्यथा, वेदना, दु:ख व्यक्त करणं हा खास पैलू आहे. तो महापूरमध्ये साकारला आहे. माणूस आणि माती याचं नातं सांगणारी कथा एक नव्या वळणावर उभी आहे. त्या नात्याचे अनेकविध धुमारे येथून पुढच्या त्यांच्या लेखनातून अधिक सकसपणे चित्रित होतील अशी अपेक्षा करावी वाटते असे मत नोंदवले आहे.

**प्रकरण सहावे :–** सहाव्या प्रकरणात आप्पासाहेब खोत यांची लेखनशैली आणि ग्रामीण कथा लेखनातील. योगदान याचा परामर्श घेतला आहे. ग्रामीण जीवनाचं संपूर्ण बदलत्या जाणिवेनिशी चित्रण करण्याचं सामर्थ्य लेखक खोत यांना आहे. परंपरेच्या पाऊलवाटेने न जाता आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत वेगळाच आविष्कार करण्याचं सामर्थ्य त्यांना लाभले आहे. हे त्यांचे वाङ:मय वाचताना निश्चित जाणवेल त्याची कथा सुरू करण्याची खास लकब आहे. जे आजवर मराठी ग्रामीण कथेत अभावानेच जाणवेल ती संवादमय शैली, नाट्यात्मकता खोत यांनी जाणीवपूर्वक हाताळलेली आहे. त्यांचे अनेक संदर्भाने पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे. विषयवैविध्य, विधवा स्त्री चित्रण कथा विषय दु:ख वेशीला टांगणं इत्यादीतून कथा विषय मांडून त्यांनी आशय आणि अभिव्यक्तीचे अनोखे दर्शन मराठी ग्रामीण कथेत घडविले आहे ते महत्वपूर्ण आहे. त्याचा परामर्श येथे घेतला आहे. आजवर त्यांनी चार कथासंग्रह, तीन कादंबरी, दोन चरित्रात्मक पुस्तके इ. ग्रामीण साहित्य विश्वात भर घातली आहे. शिवाय संपूर्ण महाराष्ट्रात दोन हजाराच्यावर कथाकथनाचे कार्यक्रम करून समाज प्रबोधनाचा वसा पुढे चालविला आहे हे मोठे योगदान आहे. म. सा. परिषद, पुणे यांचा ग. ल. ठोकळ पुरस्कार, आचार्य अत्रे साहित्य पुरस्कार महाराष्ट्र शासनाचा बी. रघुनाथ पुरस्कार इ. मिळाले आहेत. शिवाय माचीगड साहित्य संमेलन अध्यक्ष आचार्य अत्रे मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष असे मान -सन्मान प्राप्त झाले आहेत. हे या प्रकरणात नोंदविले आहे. त्यांचे ग्रामीण साहित्यातील योगदानासंदर्भात प्रथितयश ग्रामीण कथाकाराच्या चोखाळलेल्या वाटेने जाताना १९८० नंतर आपल्या कथा लेखनाची वाट लेखक खोत यांनी वेगळेपणाने शोधली आहे. हे सांगून त्यांच्या कथा लेखनाचा प्रारंभ, लेखनातील संवादात्मकता व नाट्यात्मकता ग्रामीण जीवनाचे प्रभावी व परिणामकारक चित्रण विविध व्यक्ती

चित्रणाच्या माध्यमातून व समाजातील स्थिती गतीच्या ताणतणावाचे चित्रण करताना आप्पासाहेब खोत यांची कथा समाज प्रबोधनाचा वसा घेवून आपल्या खास लकबीने आणि त्यांच्याच म्हणून खास शैलीने मराठी कथेमध्ये एक अभिनव रूप धारण करते. परंपरेच्या पांगुळगाड्यात न अडकता स्वत:ची नवी वाट शोधण्याचा ध्यास हा खोतांच्या नवनवोन्मेषशालिनी प्रतिभेचा एक नवा आविष्कार निर्माण करण्यात यशस्वी झाली आहे. हे मराठी कथेतील एक अनन्यसाधारण योगदान म्हणावे लागेल असे मत मांडले आहे.

यापमाणे आप्पासाहेब खोत यांची मुलाखत समग्र साहित्याची सूची त्यांना लाभलेले मान-सन्मान या प्रबंधिकेला जोडलेले आहेत. ही सर्व परिशिष्टे प्रबंधिकेतील आशयाला परस्पर पूरक आणि श्रेयसकारक आहेत. अखेरीस संदर्भग्रंथाची सूची जोडून प्रबंधिकेच्याद्वारे आप्पासाहेब खोत यांच्या कथा लेखनाचे विशेष पहिल्यांदाच या प्रबंधिकेद्वारे अभ्यासकासमोर येत आहेत. ही महत्वपूर्ण बाब आहे. मिळालेल्या संदर्भानुसार हा सर्व अभ्यास संशोधनाच्या पध्दतीला अनुसरून येथे मांडलेला आहे. त्यामध्ये काही त्रुटी असण्याची शक्यता असली तरी ती त्रुटी जर काही संदर्भ उपलब्ध झाले नसेल तरच त्रुटी राहण्याची शक्यता आहे. तरी आप्पासाहेब खोत यांच्या कथासंग्रहाचे विशेष या प्रबंधिकेद्वारे मराठी अभ्यासकासमोर पहिल्यांदा येत आहेत. ही या प्रबंधिकेची जमेची बाजू धरल्यास अतिशयोक्ती होऊ नये. हे मी मराठी कथेच्या अभ्यासातील एक महत्वाचं अंग म्हणून नोंदविल्यास अप्रस्तुत ठरू नये असे वाटते.

# परिशिष्टे

## १. आप्पासाहेब खोत यांची मुलाखत

सायंकाळची वेळ ६. गवनेर बंगल्या बाहेरील बाजूस आप्पासाहेब खोत एका व्यक्तीबरोबर गप्पा मारत असताना मी त्यांच्याकडे जाता जाता नमस्कार तात्यासाहेब...)

तात्या : नमस्कार .. नमस्कार ... या. या. बसा. तुम्ही येणार म्हणून तर वाट पाहात वेळ घालवत बसलो आहे.

मी : प्रसिध्द कथाकाराची भेट घ्यायची म्हणजे ठरवून घ्यावी लागते हो.

तात्या : प्रसिध्द कथाकार नव्हे तर एक आपल्यासारखाच सामान्य माणूस आहे.

मी : पण सामान्य माणसातच असामान्यत्व दडलेले असते. तुम्ही एक शिक्षक असूनही लेखनाकडे कसे काय वळलात ?

तात्या : याचा इतिहास मोठा आहे. माझं बालपण हे मळ्यातील घरातच गेलं. मी माझी आई, आजी, वडील मळ्यात राहत होतो. त्यामुळं लहानपणापासून आईला कामधंद्यात मदत करता करता त्या मळ्याच्या मातीशी म्हैस, गाय शेळी, कुत्रा, मांजर, रेडं या सर्वांशी एकरूप होवून गेलो होतो. अगदी ना कळत्या वयातसुध्दा मी सकाळी जनावराचं शेण काढण्यास वडिलांना मदत करीत असे. शिवाय शेतात आई आणि रोजगारी स्त्रिया भांगलण किंवा खुरपणी करीत असताना तिच्या मागं-मागं असायचा. मळ्यात अनेक रोजगारी स्त्रियांचा आणि माणसांचा माझा स्नेह जुळलेला होता. विशेषतः रोजगारी स्त्रिया आणि आई शेतात काम करताना बोलत राह्यच्या. त्यांच्या बोलण्यात संसारातील ताण-तणाव, सासु-सासरा, दुःख-दैन्य, दारिद्रय अपमान असे अनेक विषयांचे पदर उलगडताना मी ऐकले आहेत. या स्त्रिया आपलं मन आईजवळ मोकळं करायच्या ते मला खूप भावलं. त्याचा संस्कार माझ्या मनावर खूपच झाला आहे. मध्यमवर्गीय ग्रामीण स्त्री पाळीव प्राणी आणि त्या

संबंधीचे सर्व सुख-दुःखाचे संदर्भ घेऊनच माझं साहित्यिक विश्व फुलत गेलं. त्याचबरोबर कॉलेजचे शिक्षण घेत असताना कथा-कादंबरी इ. अवांतर वाचनाचा संस्कारही माझ्यावर झाला. त्या जाणत्या वयात माझ्या गावगाड्यातील माणसांच्या जगण्याचा व भाकरीसाठी संघर्ष करण्याच्या माणसांना मी जाणून घेत होतो. आणि मला वाटते साहित्य निर्मितीसाठी लेखक कोठे नोकरी करतो हा भाग महत्वाचा नसतो. प्राथ. शिक्षक, माध्य. शिक्षक, प्राध्यापक बँक कामगार इ. क्षेत्रामध्ये पोटापाण्याचा व्यवसाय पत्करणारा माणूस आणि लेखक यामध्ये फरक आहे मला माझ्यातील उर्मी स्वस्थ बसू देत नव्हती मी त्यामुळेच लेखनाकडे वळलो.

मी : पण तुम्हाला ग्रामीण साहित्य का लिहावेसे वाटले ?

तात्या : ग्रामीण साहित्य कथा, कादंबरी, ललित लेख मी लिहिले आहेत. माझा ज्नम खेड्यातला. बालपणही खेड्यातच गेलं आणि संस्कारक्षम वयातील माझं जगणं ही गावगाडा आणि कृषीजीवन हेच होतं. त्यामुळं मातीत राबणाऱ्या माणसांच्या वेदनेला न्याय देण्यासाठी मी लिहित राहिलो. याचा अर्थ असा नव्हे की, नागर लिहू शकत नाही. 'वनवास' नावाची माझी आयुष्यातील तिसरी कथा ही नागरच होती. त्या कथेमुळे माझे कौतुक झाले. मी मात्र मनाशी ठरवलं की, कौतुक करून घेण्यासाठी लिहायचं नाही. तर ग्रामीण माणसाची मातीशी आणि माणसाशी तुटत चाललेली नाळ आणि नातं जोडण्यासाठी मला लिहायचं आहे. म्हणून मी ग्रामीण साहित्यच लिहित राहिलो.

मी : तुम्ही ग्रामीण कथा आणि कादंबरीच लिहिली. काव्य, नाटक लिहू शकला नाही याचा अर्थ काय ?

तात्या : माझ्या हातून कथा, कादंबरी आणि ललित लेख हेच साहित्य संख्येने जास्त लिहिले गेले याचा अर्थ असा नव्हे की काव्य आणि नाटक हे साहित्य प्रकार माझ्या आवडीचे नाहीत. मी अनेक कविता लिहिलेल्या आहेत. कॉलेजच्या जीवनात तर मी अक्षरगण वृत्तामध्ये अनेक कविता केल्या होत्या पण पुढे पुढे मी मात्र कथेमध्येच गुंतलो. नाटकासंबंधी म्हणत असाल तर मी दोन चित्रपटांच्या कथा-पटकथा- संवादलेखन यांचे लेखन केलेले आहे. पण त्यात मी रमलो नाही. हे मात्र खरे.

मी : तुमच्या पुढे इतर ग्रामीण कथालेखकाचा आदर्श होता काय ?

तात्या : म्हटलं तर आहे. म्हटलं तर नाही. पण कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्याचा पश्चिम भाग विशेषत: वारणा - खोऱ्यातील भाषेचे माझ्यावर संस्कार झाले आहेत. आण्णाभाऊ साठे, चंद्रकुमार नलगे, रंगराव बापू पाटील, आणि आनंद यादव, शंकर पाटील इ. लेखकांच्या साहित्य लेखनाची जडण-घडण सुध्दा याचं प्रदेशातील, माझ्या जडणघडणीमध्ये या प्रदेशातील या लेखकांच्या साहित्याने माझ्या अनुभव विश्वाला बळ दिले. १९४२ च्या क्रांती लढ्यात स्वत:ला झोकून दिलेल्या स्वातंत्र्य वीरांचा हा प्रदेश आणि स्वातंत्र्यानंतर सहकारातून नवा माणूस घडवण्यासाठी उरफोड करणारा हा प्रदेश. तो भूतकाळ माझे अनुभवविश्व आणि बदलतं कृषी जीवन यांचा समन्वय मी साधण्याचा प्रयत्न केलेला आहे.

मी : या प्रदेशातील साहित्याची वैशिष्ट्ये कोणती ?

तात्या : प्रामाणिकपणा, प्रखर वास्तवता, नाविन्याचा शोध, नवा आशावाद, नात्याची जपणूक, भूतदया, स्वत: इतकेच माती आणि माणूस आणि प्राण्यावर प्रेम व पराकोटीची सहनशीलता, दु:खाचे कड पचवून दुसऱ्याला हसू आणि आनंद देत जगणारा माणूस ही माझ्या प्रदेशातील साहित्याची वैशिष्ट्ये म्हणता येतील.

मी : ग्रामीण साहित्य इतर साहित्यापेक्षा कसे वेगळे आहे ?

तात्या : ग्रामीण साहित्याचा वेगळेपणा सांगताना मला वाटते ते म्हणजे माणुसकीचा ओलावा व अंत:करणाचा जिव्हाळा ग्रामीण साहित्यात असतो. नाटकीपणा व बेगडीपणापासून हे साहित्य अलिप्त असते. वास्तवतेचं जबरदस्त भान साहित्य ठेवत असते. त्यामुळे काळाच्या कसोटीवर ते टिकून राहते.

मी : आपली कथा पात्रांच्या संवादातून वाचकांशी थेट संवाद साधते त्याविषयी आपण काय सांगाल ?

तात्या. : मी माझ्या साहित्याची निर्मिती माझ्या माणसांच्या बोलीभाषेत करतो. त्यांच्या दु:खावर फुंकर न घालता त्यांच्या काळजाला हात घालून त्यांना चुकलेली वाट मी दाखवतो. त्यांची टिंगल-टवाळी न करता संतांनी मनोरंजनातून प्रबोधन केले तसा थोडाफार प्रकार मी हाताळतो. त्यामुळे

त्यांना मी व माझी कथा आपलीच वाटते.

मी : मराठीतील समीक्षकांनी आपली दखल कशाप्रकारे घेतली ?

तात्या : 'महापूर' व 'गवनेर' हे दोन कथासंग्रह सोडले तर माझ्या इतर साहित्य कृतीवर कोणीही परीक्षणे लिहिली नाहीत. त्याचे नेमके कारण मला सांगता येणार नाही. तरीपण ठरवून पुस्तकांवर चर्चा आणि समीक्षण घडवून आणणं हे उद्योग मी केले नाहीत. पण एक गोष्ट चांगली की, रा. ग. जाधव, म. द. हातकणंगलेकर, डॉ. आनंद यादव, राजन गवस इ. लेखक समीक्षकांनी अनेक वयसपीठाववरून खूप कौतुक केले आहे. चांगल्या समीक्षकांनी माझ्या लेखनाची दखल घ्यावी ती माझ्या दृष्टीने अत्यंत महत्वाची गरज आहे.

मी : समकालीन कथा लेखकाचा प्रभाव आपणावर आहे काय ?

तात्या : नाही. अजिबात नाही. माझी कथा कोणाचेही अनुकरण करत नाही. माझे भावविश्व आणि स्वानुभव माझ्या साहित्यनिर्मितीला पूरक आहेत.

मी : तुमच्या कथेचा वेगळेपणा इतरांपेक्षा कसा वेगळा आहे ?

तात्या : माझ्या कथेचा वेगळेपणा म्हणाल तर नाविन्याचा शोध, माणुसकीची शिकवण, भूतदया, यंत्रयुगाची कास, नवा आशावाद, जगण्यासाठी धडपडणाऱ्या माणसांच्या व्यथा, वेदना, दुःख, माणूस आणि माती यांच्याशी निगडीत समाजप्रबोधन हा हेतू ठेवूनच लेखननिर्मिती केली आहे. ती निश्चितच वेगळी आहे.

मी : तुम्ही कथा लेखनाकडून कथाकथनाकडे वळलात त्याचे गमक काय ?

तात्या : मी कथा लिहिता लिहिता कथाकथनाकडे वळलो याचे नेमके कारण म्हणजे प्रसिध्दी मिळावी हा हेतू नव्हता तर कथाकथनाद्वारे प्रत्यक्ष रसिकांच्या मनाला सादरीकरणातून. कथा भिडवून समाज प्रबोधन करावं असे वाटल्याने ते मी करण्याचा प्रयत्न केला आणि त्यात यशस्वी ठरलो. कथाकथन हे समाज प्रबोधनाचे प्रभावी हत्यार आहे याची जाणीव मला आहे. प्रवचन, किर्तन, आणि भारूड या संत साहित्यातील साहित्य प्रकारांनी जे साध्य केले तेच नेमके कथाकथनातून साध्य होते असे माझे ठाम मत आहे.

मी : कथाकथनाचा परिणाम कथालेखनावर होतो कां ?

तात्या : कथाकथनाचा कथा लेखनावर परिणाम होईलच कसा मी तर सच्च्या अनुभूतीतून लेखन आणि कथन करीत आहे. शंकर पाटील, मिरासदार - माडगुळकर बंधू, पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, वामन होवाळ यांच्यानंतर एकमेव मी महाराष्ट्रभर कथाकथनकार म्हणून ओळखला जातो. वरील कथा-कारांच्या कथनातील उणीवा टाळून माझी म्हणून एक कथनाची 'खोती' (खोतांची कथनशैली) निर्माण केली आहे. लेखनात व कथनात मी कोणाचेही अनुकरण केले नाही. समाज प्रबोधन हा एकमेव हेतू ठेवूनच या प्रकाराकडे वळलो आहे. कथा-कथनासाठी कथा लिहिणं हे वाटते तितकी सोपी गोष्ट नाही. फार मोठी ती प्रक्रिया आहे. हा प्रयोग अनेकांनी सुरुवातीला केला आहे. त्यात त्यांना अपयश आले ही सर्वमान्य गोष्ट आहे.

मी : नवलेखकांना आपण कोणता संदेश द्याल ?

तात्या : नवलेखकांना एकच सांगणे आहे की, त्यांनी डोळे उघडे ठेवून बदलत्या कृषी संस्कृतीचे निरीक्षण करावे. खूप लिहावे व जाणकाराचे मार्गदर्शन मात्र जरूर घ्यावे. सातत्याने लिहावे.

मी : वाचकांना आपण काय सांगाल ?

तात्या : वाचकांना मला जे काय सांगायचे आहे ते मी माझ्या साहित्यातून सांगितले आहे. तरीपण वाचक चांगल्याचा स्वीकार करणारा आहे. त्याने आजच्या काळात वाचन, संस्कार जपणं महत्वाचं आहे.

मी : शेवटचे एकच विचारतो, तुम्ही एक माणूस व एक प्रसिध्द ग्रामीण कथाकार म्हणून समाधानी आहात काय ?

तात्या : मी आज पूर्ण समाधानी आहे. माणूस आणि प्रसिध्द कथाकार अशा बंदिस्त चौकटीत मी स्वत:ला बसवून घेतले नाही. संसारासंबंधीचे सद्गुण हरवून मला साहित्यिक म्हणून मोठपणा नको आहे. मातीतच पाय ठेवून मातीतल्या माणसांसाठीच स्वत:चा संसार करता - करता जेवढे देता येईल तेवढे देतो याचे समाधान आहे.

मी : आपलं यश उत्तरोत्तर असे वाढत जावो अशी मनापासून सद्इच्छा प्रकट करतो.

तात्या : आपला आभारी आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

मी : येतो पुनश्च आपल्याला शुभेच्छा !

नमस्कार.... मी, नमस्कार.

## २. आप्पासाहेब खोत यांच्या समग्र साहित्याची सूची

**प्रकाशित साहित्य –**

**कथासंग्रह**

१) गवनेर - प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर - १९९१
२) महापूर - प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर - १९९६
३) कळवंड - प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर - २००१
४) रानगंगा - मॅजिक प्रकाशन, पुणे - २०००
५) माती आणि कागुद - मॅजिक प्रकाशन, पुणे : २००३

**कादंबरी**

१) पळसफूल प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर १९९२
२) गांव पाढरं - मॅजिक प्रकाशन, पुणे २०००
३) गांढ पांढरीच्या वाटेवर - प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर २००१
४) फेसाटी मॅजिक प्रकाशन, पुणे २००३
५) शोध गर्भ सावलीचा (आगामी) प्रकाशनाच्या मार्गावर. . .

**ललित लेख संग्रह**

गाव आणि शिवार : प्रकाशनाच्या मार्गावर. . . .

**चरित्र : कुमारांसाठी :**

१) देव माणूस (कर्मवीर भाऊराव पाटील) मॅजिक प्रकाशन पुणे २०००
२) महाराणा प्रताप आगामी

**कथा–कथनाच्या कॅसेट**

१) मरणदारी अरूण कचरे प्रस्तुत कृणाल म्युझिक कं. मुंबई
२) कोंबडी-गवनेर अरूण कचरे प्रस्तुत कृणाल म्युझिक कं. मुंबई

## ३. आप्पासाहेब खोत यांना लाभलेले मान-सन्मान

१) म. सा. प. पुणे दलित कथा स्पर्धेचा पुरस्कार - दसऱ्याची कडकणी

२) म. सा. प. पुणे यांचा महापूर कथासंग्रहास १९९६ चा
ग. ल. ठोकळ पुरस्कार हस्ते - रा. ग. जाधव

३) महापूर कथासंग्रहास विठ्ठलाई साहित्य पुरस्कार १९९६
कसबा तारळे, ता. राधानगरी जि. कोल्हापूर

४) उत्कृष्ट कथाकथनकार - महाराष्ट्र राज्य कामगार संघटना
कल्याण - मुंबई यांचा १९९९. डॉ. हेमंत देशमुख कामगारमंत्री.
यांच्या हस्ते अकोला कामगार साहित्य संमेलनात प्रदान.

५) आचार्य अत्रे साहित्य पुरस्कार १९९९ हस्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले

६) महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट साहित्य निर्मितीचा १९९९-२००० चा
रानगंगा या कथासंग्रहास बी. रघुनाथ पुरस्कार, औरंगाबाद येथे
डॉ. यु. म. पठाण , प्रा. रामकृष्ण मोरे, रा. रं. बोराडे यांचे उपस्थितीत

७) राधानगरी साहित्य गौरव पुरस्कार -२००२
कविवर्य फ. मु. शिंदे यांच्या हस्ते राधानगरी जि. कोल्हापूर येथे प्रदान केला.

* माचीगड ता. खानापूर जि. बेळगाव (कर्नाटक) येथील दुसऱ्या ग्रामीण
साहित्य संमेलनाचे अध्यक्ष. १४-११-९९

* आचार्य अत्रे साहित्य प्रतिष्ठान सासवड ता. पुरंदर जि. पुणे यांचेमार्फत
५ वे मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष. १३-८-२००२

* कादरशा ता. चिक्कोडी जि. बेळगाव (कर्नाटक) येथील ८ व्या ग्रामीण
मराठी साहित्य संमेलन अध्यक्ष. ३० नोव्हेंबर २००३

* अ. भा. मराठी साहित्य संमेलन- ७१ - परळी वैजनाथ, बीड
अ. भा. मराठी साहित्य संमेलन- ७५ - पुणे
अ. भा. मराठी साहित्य संमेलन- ७७ - औरंगाबाद
निमंत्रित कथाकथनकार म्हणून उपस्थिती.
महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळ
कामगार साहित्य संमेलन
**कथाकथन- कोल्हापूर, मुंबई, अकोला.**

## संदर्भग्रंथ सूची

१) प्रतिभा साधन : ना. सी. फडके : देशमुख आणि कंपनी, पुणे

२) ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या : आनंद यादव : मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे

३) ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध : डॉ. नागनाथ कोतापल्ले : तत्रैव

४) ग्रामीण साहित्य : एक चिंतन : र. ता. भोसले : तत्रैव

५) तिसऱ्या पिढीची ग्रामीण कथा : संपा. आनंद यादव , बाबा पाटील : तत्रैव

६) ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास : डॉ.वासुदेव मुलाटे : साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद.

७) ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही : वासुदेव मुलाटे : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

८) मराठी ग्रामीण कथा : संपा. अंबादास माडगुळकर, सूर्यकांत खांडेकर

९) वाङ:मय प्रकार : आकलन आणि रसास्वाद : कथा : य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

१०) वाङ:मय प्रवाह : ग्रामीण साहित्य : य.च.म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

११) मराठी कथेची स्थिती-गती : डॉ. अंजली सोमण : प्रतिमा प्रकाशन, पुणे

१२) मराठी कथा : रूप आणि परिसर : म. द. हातकणंगलेकर : सुपर्ण प्रकाशन, पुणे

१३) काही रंग काही रेषा : डॉ. निर्मलकुमार फडकुले : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.

१४) साहित्य निर्मिती प्रक्रिया : आनंद यादव : तत्रैव

१५) गवनेर : आप्पासाहेब खोत : प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर

१६) महापूर : तत्रैव : तत्रैव

१७) रानगंगा : तत्रैव : मॅजिक प्रकाशन, पुणे.

१८) कळवंड : तत्रैव : प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर

१९) पळसफूल : तत्रैव : तत्रैव

२०) गाव पाढरं : तत्रैव : मॅजिक प्रकाशन, पुणे.

२१) गाव पांढरीच्या वाटेवर : तत्रैव : प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर.

२२) अकसिदीचे दाने : प्रतिमा इंगोले : मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद.

२३) आभाळदानी : नामदेव माळी : विवेक प्रकाशन, वारणानगर.